# पोलीस आयुक्तालय, अमरावती

## ई-पोलीस पत्रीका

दि.०८/०४/२०२१ अनु.क्र.६५

(अमरावती शहर पोलीसांची २०२१ ची उद्दिष्टे)

. जागरुक व तत्पर पोलीस

. नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.

. उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.

. महिला, मुले व जेष्ठ नागरिकांची सुरक्षा.

. जातीय सलोखा वाढविणे.

. संघटीत गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरुध्द कठोर कारवाई.

. रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/ सुरक्षा.

. पोलीस कोठडीत गुन्हे घडु न देणे.

. आरोपी पोलीसांच्या ताब्यातून पळून जाऊ नये.

. सुरक्षित व सुखकर अमरावती हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करु.

## भाग-१
## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा
## निरंक

## वेतन/वेतनवाढ/वेतन निश्चिीती/सुधारीत वेतन निश्चिती
## सुधारीत वेतन निश्चिती

**१.जा.क्र.पोआअ/पशा-३/आ.प्र.यो.तिसरा लाभ/२३५५/२०२१ अम. दि. ०१.०४.२०२१**

**आदेश**

पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवरील श्रीमती आरती संजय आठवले, प्रमुख लिपीक यांची ३० वर्षे नियमीत सेवा पुर्ण झाल्याने त्यांना सुधारीत वेतन संरचनेनुसार (७ व्या वेतन आयोगानुसार ) सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेचा तिसरा लाभ त्यांना देय असलेल्या दिनांका पासुन सातव्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर एस-१४ (रु.३८६०० -रु.१२२८००) मध्ये वेतननिश्चिती करण्यांत आले असुन आदेश निर्गमीत करण्यात येत आहे.

**२.जा.क्र.पोआअ/पशा-१/सपोउपनि ते पोउपनि./९८५/२०२१ अमरावती दि. ०५.०२.२०२१**

**आदेश**

विभागीय अर्हता परिक्षा-२०१३ मधील खालील नमुद पोलीस उपनिरीक्षक यांची अमरावी शहर घटकात तात्पुरत्या स्वरुपात पोलीस उपनिरीक्षक या पदावर पदोन्नती देण्यांत आली असुन त्यांनी पोलीस उपनिरीक्षक या पदाचा दि. २८.१०.२०२० मा.पुर्व रोजी म.पु.पदभार स्विकारला आहे.

खालील नमुद पोलीस उपनिरीक्षक यांची पदोन्नती पदावरील वेतन निश्चिती पोलीस पदोन्नती पदामध्ये वेतन निश्चिती करण्यांत येत असुन तसेच आदेश निर्गमीत करण्यांत येत आहे.

| पदनाम | वेतनश्रेणी/वेतन बँड | वेतन स्तर |
|---|---|---|
| सहायक पोलीस उपनिरीक्षक | रु.२९२००-९२३०० | एस — १० |
| पोलीस उपनिरीक्षक | रु.३८६००-१२२८०० | एस - १४ |

१.पोलीस उपनिरीक्षक, रामभाऊ जावरे नेम. विशेष शाखा
२.पोलीस उपनिरीक्षक, राजु जढाले, नेम. गाडगेनगर
३.पोलीस उपनिरीक्षक, संजय चव्हाण, नेम. गाडगेनगर
४. पोलीस उपनिरीक्षक, दिगांबर अटाळकर, नेम. फ्रेजरपुरा
५. पोलीस उपनिरीक्षक, मनोज उसरटे, नेम. राजापेठ
६. पोलीस उपनिरीक्षक, राजेंद्र उमक, नेम. सिटी कोतवाली
७. पोलीस उपनिरीक्षक, पदमाकर अभ्यंकर, नेम. अर्ज शाखा
८. पोलीस उपनिरीक्षक, गजानन उमाळे, नेम. सिटी कोतवाली

# शिक्षा/निलंबन/पुनःस्थापीत/बक्षिस/नाव कमी करणे
## नाव कमी करणे

**१.जा.क्र.पोआअ/आस्था/मयत-पखाले-१२५९/ अम. दि. ०६.०४.२०२१**

विषय :- पोना. योगेश गुलाबराव पखाले / १२५९, नेमणुक पो.स्टे. बडनेरा यांचा मृत्यु झाल्याने सेवेतुन नाव कमी करण्यांबाबत.

**आदेश**

पोलीस आयुक्त, अमरावती शहर या आस्थापनेवर कार्यरत असलेले **पोना. योगेश गुलाबराव पखाले, नेमणुक पो.स्टे. बडनेरा** यांचा दि. २३.०३.२०२१ रोजी कोरोना आजाराने मृत्यु झाला. महानगर पालिका, आरोग्य विभाग, अमरावती यांनी निर्गमीत केलेल्या मृत्यु प्रमाणपत्राचे आधारे त्यांचे नाव पोलीस आयुक्त, अमरावती शहर या आस्थापनेवरुन **दि.२४.०३.२०२१ चे मध्यान्हापुर्व** पासुन कमी करण्यांत येत आहे.

## सेवानिवृत्त

**१.जा.क्र.पोआअ/आस्था-वेनिलि/नि.व.सेवानिवृत्त/१८२५/२०२१ अम. दि. १५.०३.२०२१**

**आदेश**

खालील नमुद पोलीस अमंलदार यांचे वयाची ५८ वर्ष पुर्ण झाल्याने त्यांना दि. ३१.०३.२०२१ चे मध्यान्होत्तर पासुन नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करण्यांत येत आहे.

| अ. क्र. | अमंलदाराचे नाव पदानाम, ब.नं. | नेमणुक | जन्म दिनांक | वयाची ५८ वर्ष पुर्ण केल्याचा दिनांक | नियत वयोमाना सेवानिवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सपोउपनि. रविंद्र निळकंठराव तराळ/ ६७२ | पो.मुख्यालय | १५.०३.१९६३ | १५.०३.२०२१ | ३१.०३.२०२१ |
| ०२ | सपोउपनि. ओंकार वानखडे /६७३ | पो.मुख्यालय | २९.०३.१९६३ | २९.०३.२०२१ | ३१.०३.२०२१ |
| ०३ | पोहवा. अली असगर सज्जार हुसैन/७४२ | पो.मुख्यालय | २८.०३.१९६३ | २८.०३.२०२१ | ३१.०३.२०२१ |
| ०४ | पोना. मोहन यशवंतराव कुरोटीया /८०२ | कोतवाली | १२.०३.१९६३ | १२.०३.२०२१ | ३१.०३.२०२१ |
| ०५ | सपोउपनि. मनोहर पंजाजी घाटोळ | मो.प.वि. | ०४.०३.१९६३ | ०४.०३.२०२१ | ३१.०३.२०२१ |

# शिक्षा

**१.जा.क्र. पोआअ/विचौ-२/कर्तव्यावर हजर/मपोना-२६२ श्रीनाथ/२४३८/२०२१ दि. ०५.०४.२०२१**

**विषय** :- कर्तव्यावर हजर करुन घेण्याबाबत..
( मपोना.प्रगती श्रीनाथ, नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती)

-----ooo---

मपोना. प्रगती श्रीनाथ, नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर हया किरकोळ रजेवर रवाना झाल्या होत्या. किरकोळ रजेवरुन वेळेवर कर्तव्यावर हजर होणे अपेक्षित असतांना दि. ०१.०३.२०२१ पासुन ते आज पावेतो कर्तव्यावर वरिष्ठांचे पुर्व परवानगी शिवाय गैरहजर राहीले असुन दि. ०५.०४.२०२१ रोजी कर्तव्यावर हजर होण्याकरीता आले असता त्यांना वरिष्ठांचे समक्ष कर्तव्यावर हजर करुन घेण्यांत आले असुन त्यांचा अनाधिकृत गैरहजर कालावधी बाबत सविस्त कसुरी अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**२.जा.क्र.पोआअ/विचौ-२/कसुरी/अंतिम आदेश/वपोनि-चोरमोले-१/२३३४/२०२१ दि.३१.०३.२०२१**

कसुरदाराचे नाव :- १. वरिष्ठ पोलीस निरीक्षक आसाराम चोरमोले, नेमणुक पोलीस स्टेशन गाडगेनगर,
२. पोहवा. बलराम झिंगुजी भास्कर, पो.स्टे. वलगांव

थोडक्यांत कसुर :-

वपोनि. आसाराम चोरमले, सध्या नेमणुक पो.स्टे. गाडगेनगर, अमरावती शहर तसेच पोहवा. बलराम झिंगुजी भास्कर, नेमणुक वलगांव, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन तपासी अधिकारी पोहवा. बलराम झिंगुजी भास्कर यांचे ताब्यात नमुद आरोपी होता. तेव्हा त्यांना आरोपी विनाकारण बडबड करता होता. तेव्हा सुध्दा तो पागल असल्याबाबत शंका आली नाही. तसेच त्यांनी आरोपी विनाकारण बडबड करतो अशी माहिती वपोनि. यांना दिल्यानंतर वपोनि. यांनी हा पागल आहे असे दिसते असे म्हटल्यावर सुध्दा प्राथमीक तपासी अधिकारी यांनी नमुद आरोपीचे पागलपणाबाबत वैदयकीय अधिकारी यांचे कडुन तपासणी न करता गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल असलेला व्यक्ती दखलपात्र गुन्हा करतांना मिळुन आल्याने त्यास गुन्हयात अटक न करता पागल असल्याचे कारण देवून त्याचे पागलपणाबाबत कोणतीही शहानिशा न करता पोलीस स्टेशन वलगांव येथील अप क्र. ७४०/२० कलम ४५७,३८०,५११ भादंवि मधील आरोपी छगन पुंडलिकराव मुंडोकार रा.साऊर यास पागल असल्याचे सांगुन समजपत्रावर रिहा केल्याबाबत कसुर केला आहे.

अशा प्रकारे आपण शिस्तबध्द पोलीस खात्यात नेमणुकीस असुन सुध्दा आपल्या कर्तव्याप्रती बेशिस्तपणा केल्याचे निदर्शनास आले आहे. अशा कसुरीबाबत खालील शिक्षा अंतिम आदेश पारीत करण्यांत येत आहे.

अंतिम आदेश

उपरोक्त नमुद कसुरदार यांना देय वार्षीक वेतनवाढ एक (१) वर्षाकरीता (परिणाम न होता) रोखण्याची शिक्षा देण्यांत येत आहे.

**३.क्र.पोआअ/विचौ-१/कसुरी/अंआ/पोशि ११४५ खोब्रागडे/२२३६/२०२१ अम. २०.०३.२०२१**

**आदेश**

कसुरदाराचे नाव :- पोशि. प्रविण खोब्रागडे, ब.नं.११४५ नेम. पोलीस मुख्यालय, अमरावती शहर

थोडक्यांत कसुर :-

पोशि. प्रविण खोब्रागडे / ११४५, पो.स्टे. खोलापुरी गेट अमरावती शहर येथे नेमणुकीस असतांना दि.०८.१०.२०२१ रोजी गुन्हे शाखा तर्फे खोलापुरी गेट अप क्र. २६७/२०२० कलम ४२०,४६३,४६८,४७१,३४ भांदवि सह कलम ४,५कादया मध्ये अटक करण्यांत आलेला आरोपी पो.स्टे. कातालीच्या हवालामध्ये ठेवण्यांत आले होते. आरोपी हवालात मध्ये असतांना आरोपी दुसऱ्या आरोपी च्या मोबाईलवर फोनवरुन स्पीकर ऑन करुन हवालात दरवाज्याचे बाहेरुन अज्ञात व्यक्ती सोबत बोलणी करुन दिसल्याचे सिध्द झाले. अशा प्रकारे तुम्ही कर्तव्यावर असतांना आणि पोलीस खात्याचे संपुर्ण ज्ञान असतांना सुध्दा स्वताचे पदाचा दुरुपयोग करुन आरोपीना सहकार्य केल्याने पोलीस खात्याला न शोभणारे गैरवर्तण करुन गंभीर कसुरी केली आहे.त्याबाबत खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमीत करण्यांत येत आहे.

**अंतिम आदेश**

**उपरोक्त कसुरी प्रकरणी तरतुदीनुसार (दोन) २ वर्षाकरीता (परिणाम न होता) रोखण्याची शिक्षा देण्यांत येत आहे. तसेच त्यांचा निलंबन कालावधी दि. ०२.११.२०२० ते दि. ०४.०१.२०२१ हा जसाचे तसा करण्यांत येत आहे.**

**४.क्र.पोआअ/विचौ-१/कसुरी/अंआ/मपोशि-१९१४ तिखीले/२२३७/२०२१ अम. २६.०३.२०२१**

**आदेश**

कसुरदाराचे नाव :- मपोशि. वसुंधरा तिखीले/१९१४, नेम. गाडगेनगर, अम.

थोडक्यांत कसुर :-

मपोशि. वसुंधरा तिखीले पोलीस मुख्यालय, येथे नेमणुकीस असतांना दि. १०.१०.२०२० रोजी सकाळी १०.०० वा पोलीस मुख्यालय येथे कर्मचारी यांची हजेरी सुरु असतांना हजेरी मध्ये रापोउपनि. हनवंते व डयुटी मदतगार पोहवा. सतीश हिवे, महीला डयुटी मदतगार मपोना. वैशाली फुले असे अधिकरी / अमंलदार हजर असतांना मपोका वसुंधरा तिखीले हया राखीव पोलीस निरीक्षक, उभे असतांना रापोउपनि. हनवंते यांच्या कडे आल्यया व महिला डयुटी मदतगार व डयुअी रजिस्टर लिहण्याकरीता मदतनीस म्हणुन दिलेले मपोशि. रुपाली वाफले यांना ताबडतोब डयुटी वरुन काढा असे म्हटले तसेच राखीव पोलीस निरीक्षक यांना बाम्डेकर यांना महीला डयुअी मदतगार यांना ताबडतोब काढा नाहीतर मी तुम्हाला २४ तासात सस्पेंड करायला लावेल व तुझ्या विरोधात कलम ३५४ चा गुन्हा दाखल करते व तुमच्या विरोधात पत्रकार यांना सांगते असे धमकीचे वक्तव्य पोलीस मुख्यालय येथील महीला व पुरुष अमंलदार हजर असतांना वरिष्ठ अधिकरी यांचेशी केलेले आहे. सदर महीला अमंलदार याी अवाच्छ, असभ्य व्यक्तव्याबाबत पोलीस मुख्यालय येथे स्टेशन डायरी सोना.क्र.१५/२०२० दि. १०.१०.२०२० वेळ १०.२२ वा मिनीटांनी घेण्यांत आलेली आहे. असे बेकायदेशी व्यक्तव्यस

करुन पोलीस खात्याची प्रतिमा मलीन करण्याचे कर्तव्यात कसुर केल्याचे प्राथमिक चौकशी अंति दिसुन आले अशा प्रकारे कसुरीबाबत खालील अंतिम आदेश निर्गमीत करण्यांत येत आहे.

## अंतिम आदेश

उपरोक्त कसुरी प्रकरणी तरतुदीनुसार (दोन) २ वर्षाकरीता (परिणाम न होता) रोखण्याची शिक्षा देण्यांत येत आहे. **तसेच त्यांचा निलंबन कालावधी दि. १२.११.२०२० ते दि. ०४.०१.२०२१ हा जसाचे तसा करण्यांत येत आहे.**

**( अशोक लांडे )**
प्र.सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन)
पोलीस आयुक्त, अमरावती शहर करीता

प्रत, पत्रव्यवहार शाखा/सेवापट नोदंणी लिपीक, आस्थापना शाखा/ सीसीटीएनएस कक्ष, यांना
माहितीस व आवश्यक कार्यवाहीकरीता.